Roll No.
रोल नं.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**Series RKM**

**Code No. / कोड नं. 8**

- Please check that this question paper contains 4 printed pages.
- Code number given on the right hand side of the question paper should be written on the title page of the answer-book by the candidate.
- Please check that this question paper contains 8 questions.
- Please write down the serial number of the question before attempting it.
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में मुद्रित पृष्ठ 4 हैं।
- प्रश्न-पत्र में दाहिने हाथ की ओर दिए गए कोड नम्बर को छात्र उत्तर-पुस्तिका के मुख-पृष्ठ पर लिखें।
- कृपया जाँच कर लें कि इस प्रश्न-पत्र में 8 प्रश्न हैं।
- कृपया प्रश्न का उत्तर लिखना शुरू करने से पहले, प्रश्न का क्रमांक अवश्य लिखें।

# MARATHI
# मराठी

*Time allowed : 3 hours* — *Maximum Marks: 100*

*निर्धारित समय : 3 घंटे* — *अधिकतम अंक : 100*

**1.** (अ) खालीलपैकी कोणतीही ***पाच*** वाक्ये कंसांतील सूचनांप्रमाणे बदलून पुन्हा लिहा : 5

(i) ते चाकू आहेत. (एकवचन करा)

(ii) रिंकी स्वयंपाक करत आहे. (हे कोणत्या प्रश्नाचे उत्तर आहे, तो प्रश्न लिहा)

(iii) आता लौकरच त्या येतील. (विरुद्ध अर्थाचे वाक्य लिहा)

(iv) सकाळीच तिचा फोन आला. ('फोन' ऐवजी 'पत्र' शब्द वापरा)

(v) ललिता एकटीच आली. ('ललिता' ऐवजी 'अनुपम' कर्ता करा)

(vi) मला खूप भूक लागली म्हणून मी जेवून घेतले. (दोन वेगळी वाक्ये करा)

(vii) लौकर टॅक्सी बोलावणे आवश्यक आहे. (आज्ञार्थी वाक्य करा)

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***पाच*** वाक्यांचा काळ कंसांतील सूचनांप्रमाणे बदलून ती वाक्ये लिहा : 5

(i) मी शनिवारी तुम्च्याकडे येईन. (भूतकाळ करा)

(ii) रस्त्यात कोणीतरी ओरडत आहे. (भूतकाळ करा)

(iii) जोराचा वारा सुटला आहे. (भविष्यकाळ करा)

(iv) मी नुकतीच आंघोळ केली होती. (भविष्यकाळ करा)

(v) तापाच्या साथीने उग्र रूप धारण केले. (भविष्यकाळ करा)

(vi) महिनाभर ती घरीच असेल. (भविष्यकाळ करा)

(क) पुढीलपैकी कोणतीही ***पाच*** वाक्ये शुद्धलेखनाच्या चुका दुरुस्त करून लिहा : 5

(i) आपन भारतिय आहोत.

(ii) हींदी आपली राष्ट्रभाशा आहे.

(iii) त्याणे खुप कष्ट केले.

(iv) मतदाण करणे नागरीकांचे कर्तव्य आहे.

(v) दूधात साकर घालू नका.

(vi) रोज भरपुर पानी प्या.

**2.** पुढीलपैकी कोणत्याही ***एका*** विषयावर निबंध लिहा : 15

(i) इंटरनेट : माहितीच्या भांडाराची किल्ली

(ii) आजच्या काळाची आव्हाने

(iii) रस्त्यात कसे वागावे

**3.** रुग्णालयाच्या व्यवस्थापकांना पत्र लिहू रुग्णालयातील गैरसोयींचे वर्णन करा. 8

**किंवा**

काही पुस्तके व्ही.पी. पार्सलने पाठवून देण्याविषयी पुस्तकांच्या दुकानदारास पत्र लिहा.

**4.** पुढील उताऱ्याचा एक तृतीयांश सारांश तुमच्या शब्दांत लिहा : 10

गरिबी म्हणजे एक मोठीच वाईट गोष्ट आहे असे वाटते. एक सर्वमान्य समजूत अशी असल्याचे दिसून येते की जर लोकांच्याकडे केवळ जास्त पैसा असला तर ते सुखी होतील आणि दुसऱ्याच्याही उपयोगी पडतील आणि जीवनाचा अधिक आस्वाद घेतील. तथापि एखाद्या श्रीमंताच्या महालापेक्षा गरिबाच्या सामान्य खोपटात जीवनाचे खरेखुरे समाधान अधिक गवसते आणि जीवनाचा आस्वादही अधिक प्राप्त होता. कारण प्रामणिक गरिबी किती मधुर आणि शुद्ध आणि सुखी असते, कुटुंबाला आधार देण्याच्या समान प्रवृत्तीतून त्या कुटुंबाचे सदस्य सामाजिक दुष्प्रवृत्तींपासून व हेव्याढाव्यांपासून कसे मुक्त असतात, ते कसे परस्परांशी प्रेमाने आणि एकीने वागतात, ते मला चांगले माहीत आहे. याच कारणांमुळ गरिबांच्या श्रेणीमधून इतके सामर्थ्यवान, श्रेष्ठ, स्वावलंबी पुरुष उदयाला आले आणि नेहमीच उदयाला येत राहतील. ''जे मरण्यासाठी जन्मले नव्हते असे चिरंजीव'' अशा लोकांची यादी जर तुम्ही वाचलीत, तर तुम्हाला असे आढळेल की त्यांतले बरेचसे लोक गरिबीत जन्मलेले होते.

**5.** पुढील उतारा वाचून त्याखली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : 12

चित्रपट पाहण्याचे दुष्परिणाम हे होतातच. एक म्हणजे पैशाचा व्यय व दुसरा म्हणजे वेळेचा अपव्यय. पैसा आणि वेळ या दोन्ही गोष्टी चित्रपट पाहण्याकरिता उधळण्यापेक्षा स्वतः करिता आणि इतरांकरिता या दोन्ही गोष्टींचा अधिक चांगला उपयोग करता आला असता. कितीतरी चमकदार आणि होतकरू तरुणांचे भवितव्य चित्रपटांमुळे विसकटून जाते, कारण चित्रपट त्यांच्या ठायी एक प्रकारचे उत्तेजितणाचे, थरारकतेचे आणि प्रणयरम्यतेचे वेड निर्माण करतात. मग हे तरुण फालतू संगीत गंमतीजंमतींनी आणि अर्धनग्न मुलींच्या घोळक्यांनी आकृष्ट होतात. तथापि, समाजाचे नैतिक अधःपतन घडवून आणणाऱ्या या सर्व उणीवा जर चित्रपटांतून काढून टाकल्या, तर चित्रपटाचे भवितव्य उज्ज्वल आहे आणि मानवतेकरिता कल्याणप्रद असेही त्याला काही करता येईल.

(i) चित्रपटांमुळ कोणते दुष्परिणाम होतात ?

(ii) पैसा आणि वेळ चित्रपटांवर खर्च करण्यापेक्षा काय करावे ?

(iii) चांगल्या तरुणांवर चित्रपटाचा कोणता परिणाम होतो ?

(iv) चित्रपटाचे भवितव्य केव्हा उज्ज्वल बनेल ?

**6.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : 10

(i) नवरदेव कशासाठी रुसला ? त्याने दाजीला कोणते कारण सांगितले ?

(ii) लेखकाने माईंच्या मोहक व्यक्तिमत्त्वाचे वर्णन कसे केले आहे ?

(iii) स्वर्गातील जागा कोणाला मिळाली ? का ?

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 10

(i) ''मला ते काही कळलं नाही. पण यापुढं ठरवलं 'शिकवा' म्हणायचं नाही.''

(ii) ''तासाभरात हे संपले. मी एकटाच जड पावलांनी घरी यायला निघालो.''

(iii) ''डोळ्यांत हसू होते. काढवी बांधली तर श्वासाबरोबर तुटेल अशी छाती होती.''

**7.** (अ) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** अवतरणांचे संदर्भासह स्पष्टीकरण करा : 6

(i) ''गर्द हिरव्या पालवीत रंग भरून आले
आकाशच उतरून सोने पेरून गेले''

(ii) ''श्रीगुरुसारिखा असता पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी ।।
राजयाची कांता काय भीक मागे। मनाचिये जोगे सिद्धी पावे।।''

(iii) ''उठती वरती जलदांवरती अनंत संध्याराग पहा !
सर्व नभावर होय रेखिले सुंदरतेचे रूप महा !''

(ब) 'साऱ्या कळ्यांना' आणि 'हे बंध रेशमाचे' यांपैकी एका कवितेचे रसग्रहण करा. 4

**8.** (अ) 'मीरा मधुरा' या नाटकातील गौण पात्रांच्या व्यक्तिचित्रणाचे वर्णन करा. 6

**किंवा**

'मीरा मधुरा' या नाटकातील प्रमुख संघर्ष कोणता आहे, ते सांगा.

(ब) पुढीलपैकी कोणत्याही ***दोन*** प्रश्नांची उत्तरे द्या : 4

(i) 'मीरा मधुरा' नाटकातील मीरेच्या भक्तिभावाचे स्वरूप सांगा.

(ii) 'मीरा मधुरा' नाटकाच्या प्रारंभीचा प्रसंग वर्णन करा.

(iii) 'मीरा मधुरा' हे नाटक कोणी लिहिले आहे ?